# त्या बिबट, सांबरची हत्याच

## अज्ञात शिकाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल





पाय बांधून विहीरित लटकवित अत्यंत निर्घृणपणे संपविले

व्याघ्र प्रकल्पाच्या अतिसंवेदनशील भागात शिकाऱ्यांचा तांडव

मारोती पाटणकर

**चुरणी,( दि.28 )** – मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अति संवेदनशील मानल्या जाणाऱ्या चिखलदरा गुगामल वन्यजीव वनपरिक्षेत्रातील चुरणी वर्तुळात वन खंड क्रमांक 38 मध्ये सोमवारी(दि.27) मृतावस्थेत आढळलेल्या बिबट आणि सांबर (हरिण) ची हत्याच झाली असल्याचे स्पष्ट होत आहे. शिकाऱ्याने या दोन्ही वण्यप्राण्यांची हत्या करत, त्यांचे पाय बांधून त्यांना पुनर्वसित चुरणी या गावातील विहिरी मध्ये लटकविले. व्याघ्र प्रकल्पाच्या अतिसंवेदशील भागात शिकाऱ्यांनी केलेल्या या तांडवामूळे वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.

सोमवारी सकाळी साडे दहाच्या सुमारास वन कर्मचारी चुरणी वर्तुळात गस्तीवर असताना दुर्गंध आल्याने त्यांनी एका विहिरीमध्ये पाहिल्यावर त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. एक बिबट व सांबर हरिणाची हत्या करुन त्यांना विहिरीच्या आतमध्ये लटकविलेले होते. दोन्ही वण्यप्राण्यांचे वय अंदाजे दोन ते अडीच वर्ष असावे असे सांगण्यात येत आहे.

**अवयव साबूत तर हत्या कश्याकरिता ?**

एकीकडे वनविभागाच्या म्हणण्यानुसार या दोन्ही वण्यप्राण्यांचे अवयव साबूत आहे, तर मग यांची हत्या कशाकरिता झाली, हे उमजू शकले नाही. अतिसंवेदशील भागात झालेल्या या घटनेमूळे वण्यप्रेमींकडून वनविभागाविरुध्द रोष व्यक्त केला जात आहे.

या प्रकाराची गंभीरतेने दखल घेवून वेगवेगळ्या अँगलने तपास सुरू आहे. घातपाताची शक्यता आहे. अज्ञात आरोपी विरोधात वन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**राहुल दाईत, वनपरिक्षेत्र अधिकारी, चिखलदरा.**

**वनअधिकारी, कर्मचाऱ्यांची होणार चौकशी**

चूरणी हा भाग व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात येतो, तसेच व्याघ्र प्रकल्पाचा हा अतिसंवेदनशील भाग आहे. हा भाग चिखलदरा मुख्यालयापासून अतिशय जवळ आहे. तरी या ठिकाणी असा प्रकार झाल्याने वाघांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. तसेच व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेविषयीसुध्दा साशंकता निर्माण झाली आहे. याप्रकरणी याला जबाबदार वनअधिकारी व कर्मचाऱ्यांची वरिष्ठांकडून चौकशी होणार यात दुमत नाही.




# शिवसेनेच्या आंदोलनामूळे एसटीची चाके जाम

- एसटी बसच्या भाडेवाढीविरोधात आंदोलन
- अमरावती मध्यवर्ती बसस्थानकासमोर केले आंदोलन



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.28 )**– राज्य शासनाकडून नुकत्याच करण्यात आलेल्या एसटी बसच्या तिकीट दरवाढीविरोधात नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दरम्यान शिवसेनेच्या (उबाठा) वतीने मंगळवार (दि.28) अमरावती मध्यवर्ती स्थानकासमोर चक्काजाम आंदोलन करून दर वाढीचा निषेध करण्यात आला. यावेळी शिवसैनिकांनी सरकारविरोधात प्रचंड घोषणाबाजी केली. आंदोलनामुळे जवळपास अर्धा तास एसटी बसेसची चाके थांबली होती.

राज्य शासनाने नुकतीच एसटी बसच्या तिकीट दरात वाढ केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना फटका बसत असून आताच्या सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने हवेतच विरल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. भंगार बसेसने महाराष्ट्रातील जनतेला प्रवास करावा लागत असून त्यातही आता भाडेवाढ केल्याने नागरिकांमध्ये सरकारविरोधात रोष व्यक्त होत आहे, असा आरोपही शिवसैनिकांनी केली. यावेळी शिवसैनिकांनी राज्य शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत बसेस रोखून धरल्या. शिवसेनेच्या आंदोलनामुळे नागपूरसह अमरातीत ग्रामीण भागात जाणाऱ्या बसेस काही वेळ खोळंबल्या होत्या. यावेळी पदाधिकाऱ्यांनी बसस्थानकात जाऊन प्रवाशांसोबत भाडेवाढीबाबत चर्चासुद्धा केली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कडक पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

आंदोलनात जिल्हा प्रमुख मनोज कडू, पराग गुडधे व नरेंद्र पडोळे, शहरप्रमुख संजय शेटे, प्रवीण हरमकर, उपजिल्हा प्रमुख नितीन हटवार, माजी नगरसेवक प्रदीप बाजड, नरेंद्र निर्मळ, प्रमोद कोहळे, बंडू साऊत, प्रशांत वानखडे, वैभव मोहोकार, कपिल देशमुख, सचिन ठाकरे, शिवराज चौधरी, सुनील राऊत, अमोल पवार, विनोद मंडळकर, विजय बेनोडकर, संजय कोलटेके, ओंकार ठाकरे, पिंटू अनासाने, राजेश शर्मा, नाना देऊळकर, प्रतीक कोंडके यांच्यासह अनेक शिवसैनिक सहभागी झाले होते.

# पत्रकारांसाठी सत्याधीष्टीत पत्रकारिताच खरा कर्मयोग!

ज्येष्ठ पत्रकार प्रकाश चौधरी यांचे प्रतिपादन

अमरावती श्रमिक पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा



महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.28 )**– सत्याधीष्टीत काम करणे हीच खरी पत्रकारिता असून तोच आपला खरा कर्मयोग आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रकाश चौधरी यांनी केले. अमरावती श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने रविवार प्रजासत्ताकदिनी राजापेठस्थित श्रमिक पत्रकार भवनात आयोजित पत्रकार पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, ज्येष्ठ समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया, दैनिक विदर्भ मतदार चे संपादक अॅड. दिलीप एडतकर, आयएनएसचे पदाधिकारी व दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, भारतीय जैन संघटनेचे माजी अध्यक्ष सुदर्शन गांग, महापालिकेचे सहआयुक्त भूषण पुसतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरेश भट यांच्यानंतरचे अमरावतीचे 80 च्या दशकातील पहिले जिल्हा प्रतिनिधी प्रकाश चौधरी म्हणाले की, मी शिक्षक असताना हा पेशा स्वीकारला. पुढे मुख्याध्यापक की लोकमतचा जिल्हा प्रतिनिधी, असा पर्याय माझ्या पुढे होता. तत्कालीन शिक्षण व्यवस्थेविरुद्ध बंडाची पार्श्वभूमी असल्यामुळे तसेच अन्यायाविरुद्ध लढा हा पत्रकारच देऊ शकतो, या भूमिकेतून स्वाभाविकच मी पत्रकारिता निवडली. 92 वर्षीय प्रकाश चौधरी यांनी सांगितले. गेल्या दोन वर्षापूर्वी द्रोपदी मुर्मू राष्ट्रपती झाल्या, तेव्हा मी शेवटचा लेख लिहून माझी लेखणी थांबविली. अशा स्थितीत मी आपणास कसा लक्षात राहिलो हे, माझ्यासाठी अनाकलनीय आहे. तसे पाहिले तर आजचा काळ हा विसरण्याचा आहे. पण श्रमिक पत्रकार संघाने माझी आठवण ठेवली. सगळ्या जुन्या जाणत्या सहकाऱ्यांना भेटण्याचा योग आणला, या शब्दात त्यांनी आभारही व्यक्त केले.

**जीवन गौरव पुरस्काराने केले सन्मानित**

दैनिक प्रतिदिन अखबारच्या बातमीदार मीनाक्षी कोल्हे, दैनिक अमरावती मंडलचे चंद्र प्रकाश दुबे यांना, लोकमत समाचारचे नासिर हुसेन व साम मराठी टीव्हीचे अमर घटारे यांना देऊन पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. प्रत्येकी 11 हजार रुपये रोख, शाल-श्रीफळ आणि सन्मानचिन्ह, असे या पुरस्कारांचे स्वरूप होते. या कार्यक्रमाचा मुकुटमणी असलेला हा प्रसंग प्रकाश चौधरी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आहे.

## तरुणावर प्राणघातक हल्ला

महासागर प्रतिनिधी

**अमरावती** – गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विलास नगर गल्ली क्रमांक 5 मध्ये एका तरुणावर हल्ला करण्यात आला. 26 जानेवारी रोजी यश सुभाषराव तांगडे नामक तरुण हा विलासनगरात बसला होता. त्यावेळी आरोपी अनिकेत विश्वकर्मा याने यशवर हल्ला केला. त्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी अनिकेत विश्वकर्माविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**प्रजासत्ताक दिनी कुष्ठरोग जनजागृतीपर प्रतिज्ञा**

**अमरावती**– प्रजासत्ताक दिनानिमित्त अमरावती जिल्हा अंतर्गत शासकीय, निमशासकीय आणि खाजगी सर्व संस्था, शाळा, महाविद्यालय, कार्यालय इत्यादी ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ध्वजारोहण कार्यक्रमानंतर कुष्ठरोग मुक्त भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कुष्ठरोग जनजागृती पर प्रतिज्ञा यावेळी घेण्यात आली. शासकीय कर्मचारी, अशासकीय कर्मचारी, खाजगी व्यावसायिक तसेच नागरिकांनी कुष्ठरोग प्रतिज्ञेचे वाचन केलेले आहे. संविधानानुसार प्रत्येक भारतीयाला समान संधी, समान हक्क, समान अधिकार आहेत.

## जादूटोण्याच्या संशयावरुन महिलेला मारहाण

**चिखलदरा तालुक्यातील बोरी येथे पुनरावृत्ती**

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.28 )**– चिखलदरा येथे अंधश्रद्धेचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. जादूटोणा केल्याच्या आरोपाखाली एका महिलेवर मारहाण करण्यात आली आणि तिला जीवे मारण्याची धमकी देऊन तिचा विनयभंग करण्यात आला. ही घटना 26 जानेवारी रोजी रात्री 8 वाजता चिखलदरा पोलीस स्टेशन हद्दीतील बोरी येथे घडली.

महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी शिवा सुरेश दारसिंबे (23, रा. बोरी, चिखलदरा) याच्याविरुद्ध महाराष्ट्र मानवी बलिदान आणि अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

चिखलदरा येथील बोरी येथे राहणारी 55 वर्षीय महिला 26 जानेवारीच्या रात्री तिच्या सासूसोबत घरी होती. यावेळी आरोपी शिवा सुरेश दारसिंबे तिथे आला आणि शिवीगाळ करू लागला. त्यावेळी ती महिला घराबाहेर पडली, तेव्हा त्याने तिला शिवीगाळ केली आणि तिला जिवे मारण्याची धमकी देत म्हटले, तू जादूटोणा करतेस, तू माझ्या तीन मुलांना मारलेस. त्यानंतर त्याने महिलेला पकडले आणि तिचा विनयभंग केला. महिलेने 27 जानेवारी रोजी सकाळी 7 वाजता चिखलदरा पोलिस ठाण्यात या प्रकरणाची तक्रार दाखल केली.

# वीज खांबावर खाट बांधून हवेत उपोषण

**खांब बाजुला करण्याच्या मागणीसाठी आगळेवेगळे आंदोलन**



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.28 )**– चांदूर बाजार तालुक्यातील सोनेरी येथे वीजेचा खांब रस्त्याच्या बाजूला करण्यासाठी विलास चर्जन यांनी चक्क इलेक्ट्रिक पोलवर खाट बांधून जीव धोक्यात घालत हवेत ठिय्या देत उपोषण आहे.

अमरावतीत एका अनोख्या उपोषणाची चर्चा रंगू लागली आहे. वारंवार इलेक्ट्रिक पोल काढण्यासंदर्भात तक्रारी करून देखील पोल हटवण्यात न आल्याने चर्जन यांनी अनोख्या उपोषणाला सुरुवात केली. इलेक्ट्रिकच्या पोलवर खाट बांधून त्यावर बसत त्यांनी उपोषणाला सुरुवात केली. या उपोषणामुळे प्रशासनाला जाग येणार का, असा प्रश्न सोनोरीत उपस्थित करण्यात येत आहे.

**अनेक ठिकाणी खांब रस्त्यातच असतात...**

गावागावात अनेक ठिकाणी विजेचे पोल हे रस्त्यातच उभारलेले असतात. वाड्या वाड्यांना जाण्यासाठी काही वेळा नवीन रस्ते केला जातात. तेव्हा त्यात खांब येतात. आधीच्याच रस्त्यांवर काहीवेळा हे खांब उभे असतात. परंतू, ते हटवून रस्त्याच्या बाजुला उभारण्याची तसदी घेतली जात नाही. कोणाच्या शेतात मधोमध खांब असतो. हे खांब बाजुला करण्यासाठी महावितरण कडून पैसे आकारले जातात. लोकांच्या जिवाचा विचार केला जात नाही, असा आरोप वेळोवेळी लोक करत असतात.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या शहरात



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.28 )**– महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवार(दि.31) जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, बावनकुळे यांचे शुक्रवारी सकाळी 10 वाजता श्री अंबादेवी मंदिर येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी 10.30 वाजता आमदार रवी राणा यांच्या निवासस्थानी भेट देतील. त्यानंतर सकाळी 11 वाजता मिट द प्रेस होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी 12 वाजता जिल्हा विकास आराखड्याबाबत ते आढावा बैठक घेतील. दुपारी 3 वाजता विभागीय आयुक्त यांचे सादरीकरण आणि आढावा, दुपारी 4.30 वाजता नोंदणी उपमहानिरीक्षक यांचे सादरीकरण व आढावा, सायंकाळी 5.15 वाजता भूमी अभिलेख उपसंचालक यांचे सादरीकरण व आढावा घेतील. रात्री 8 वाजता गृहभेटी आणि त्यानंतर रात्री 10 वाजता अमरावती येथून नागपूरकडे ते प्रस्थान करतील.

# आरटीई : 2 फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ

**आतापर्यंत 6959 अर्ज सादर**




महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.28 )**– आर्थिक दुर्बल घटकातील पाल्यांना नामांकित खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

या आरटीईत प्रक्रियेला जिल्ह्यात पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात 2 हजार 430 जागांकरीता होत असलेल्या प्रवेशासाठी सोमवार 27 जानेवारी शेवटची तारीख होती. त्यामुळे पालकांनी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार शिक्षण विभागाकडून याला मुदतवाढ देण्यात आली आहे.

आता 2 फेब्रुवारी पर्यंत पालकांना आपल्या पाल्यांचे प्रवेश अर्ज करता येणार आहे. मुदतवाढ मिळाल्याने पालकांना दिलासा मिळाला आहे. मंगळवारी सायंकाळी 7 वाजेपर्यंत 6 हजार 959 प्रवेश अर्ज प्राप्त झाले आहे. जिल्हयात आरटीई प्रक्रियेला 16 डिसेंबरपासून सुरुवात करण्यात आली. यामध्ये 4 जानेवारीपर्यंत पहील्या टप्प्यात शाळा नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात आली. यादरम्यान जिल्ह्यातील पात्र 239 शाळांपैकी यंदा 225 शाळांची नोंदणी करण्यात आली आहे. नोंदणी झालेल्या शाळांच्या पटसंख्येच्या 25 टक्केच्या प्रमाणात 2 हजार 430 जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. या जागांवर आता नि:शुल्क आरटीई प्रवेश स्वीकारल्या जात आहे. या दरम्यान 15 जानेवारीपासून ऑनलाईन अर्ज करण्याला सुरूवात करण्यात आली. मंगळवारी 28 जानेवारी सायंकाळी 7 वाजेपर्यंत जिल्ह्यात 6 हजार 959 प्रवेश अर्ज प्राप्त झाले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अर्ज करण्याची धुम जिल्ह्यात दिसून येत आहे. यंदा गतवर्षी पेक्षा अधिक अर्ज दाखल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**ईश्वरचिठ्ठीने होणार निवड**

या प्रक्रियेनंतर प्राप्त अर्जामधून ईश्वरचिठ्ठी काढण्यात येणार आहे. या प्रक्रीयेमध्ये नशिबवान बालकांचे प्रवेश होणार आहे. तत्पूर्वी सोमवारी अर्ज करण्याची शेवटची संधी पालकांना होती. त्यामुळे पालकांकडून मुदतवाढ देण्याची मागणी होत असतांना शिक्षण विभागाने 2 फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे पालकांना दिलासा मिळाला आहे.

# एमआयडीसी असोसिएशनची निवडणूक अविरोध

**2 फेब्रुवारीला होणार अधिकृत घोषणा**



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.28 )** – एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशन 21 सदस्याच्या संचालक मंडळासाठी मंगळवारी (दि.28)अविरोध निवडणूक पार पडली. ऐन वेळेवर दिनेश सिंह आणि मोहन बसंतवाणी यांनी आपला नामांकन अर्ज मागे घेतला. त्यामुळे ही निवडणूक अर्विरोध झाली. मात्र यासंदर्भात अधिकृत घोषणा 2 फेब्रुवारीला होणार आहे. याच दिवशी अध्यक्ष पदावर देखील निर्णय होईल.

दरम्यान निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे एकूण 21 पदांसाठी 21 च नामांकन दाखल असल्याने सर्व कार्यकारिणीतील पदावर निर्विरोध निवड पार पडली. आगामी 2 फेब्रुवारी रोजी एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या 21 सदस्य संचालक मंडळासाठी निवडणूक होणार होती. यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब देशपांडे यांच्या देखरेखित निवडणूक प्रक्रिया सुरू होती. 21 सदस्य संचालक मंडळासाठी एकूण 23 नामांकन दाखल झाले होते. त्यामुळे निवडणूक होणारच असे मानले जात होते. दरम्यान नामांकन परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी उद्योजकांनी एकतेचे प्रदर्शन केले. दिनेश सिंह आणि मोहन बसंतवाणी यांनी आपले नामांकन परत घेतले. त्यामुळे 21 पदांसाठी केवळ एकवीसच नामांकन कायम असल्याने सर्व पदांवर अविरोध निवडणूक पार पडली. दरम्यान एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनचे मावळते अध्यक्ष किरण पातुरकर यांनी अविरोध निवडणूक झाल्याबद्दल आणि उद्योजकांनी दाखवलेल्या एकजूटतेबद्दल कौतुक केले.

**किरण पातुरकरसह 19 सदस्य अविरोध**

अशोक अग्रवाल (गोयल),दीपक अग्रवाल, दिलीप अग्रवाल (डीके), मुकेश अग्रवाल, नंदकिशोर अग्रवाल, राजेंद्र अग्रवाल, राजेश अग्रवाल, पुरुषोतम बजाज, गजानन बारोटकर, महेश बत्रा, कमलेश डागा, सचिन जाधव, बंटी जगमलानी, ए.आर.माधोगढिया, विजय मोहता, किरण पातुरकर, अजय पवार, परेश राजा, प्रकाश राठी, आशिष सावजी हर्षवर्धन वर्मा या सदस्यांची अविरोध निवड झाली.

"दोन सदस्यांनी घेतलेल्या सामंज्यस्याच्या भूमीकेमुळे आणि उद्योजकांनी दाखविलेल्या एकजुटतेमुळे ही निवडणुक अविरोध झाली. आगामी काळात असोसिएशन उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी कार्य करणार आहे.

**किरण पातुरक, अमरावती एमआयडीसी असोसिएशन, विद्यमान अध्यक्ष**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# सूर्यफूल, करडई, जवस शिवारातुन गायब

## रासायनिक विषारी औषधांमुळे मधमाशा नामशेष





**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट, ( दि.28 )-** सूर्यफूल पीक हे हलक्या, मध्यम प्रतीच्या जमिनीत, कमी पाणी, कमी खर्च, कमी कालावधीत, एकरी सात ते आठ क्विंटलचा उतारा देणारे हे पीक आहे. अतिवृष्टीने सोयाबीन सारखे हे पिक हातचे जात नाही. पाणी कमी लागत असल्याने अत्यल्प पर्जन्यमानात ही पिक तग धरते. त्यामुळे उत्पन्न घटत नाही. पेरणीनंतर एकदोन कोळपणीवर पिक जोमात येते. सुपाच्या आकाराएवढी येणारी सुर्यफुले शेतकऱ्यास आर्थिक समृद्धी देणारी आहेत. भुईमुगातील पिकातील सुर्यफुलाचे पिक कुटुंबाला वर्षाकाठी लागणाऱ्या खाद्यतेलाची सोय करणारे असले तरी, काळाच्या ओघात सोयाबीनचे क्षेत्र वाढल्याने हे पीक दुर्लक्षिलेजाऊ लागल आहे. पीक आर्थिक दृष्ट्या किफायत शीर असले तरी सोयाबीनचे अवास्तव वाढलेले प्रस्थच सुर्यफुलाच्या पिछाडीस कारणीभूत असल्याचे दिसून येते.

### शास्त्रीय निष्कर्ष

सुर्यफुलाचे दाणे सेवन केल्याने हृदयरोग व मधुमेहाचा धोका कमी करण्यास मदत होते. कोलेस्टेरॉल व रक्तदाबावर नियंत्रण मिळवता येते. तेलाचे आहारातून नियमित सेवन झाल्यास शुक्राणू बळकट होण्यास मदत होते. प्रोस्टेट कर्करोगाचा धोका कमी होतो. असे शास्त्रीय निष्कर्ष आहेत. सिंचन व्यवस्थेमुळे जिराईत क्षेत्र मोठ्या प्रमाणावर घटले असून, त्याचा परिणाम खरीप हंगामात घेतल्या जाणाऱ्या कडधान्याच्या उत्पन्नावर झाला तसा खाद्य तेलाच्या उत्पन्नासाठी घेतल्या जाणाऱ्या सुर्यफुलाच्या पिकावरही झाला आहे. सिंचन क्षेत्र वाढाण्यापूर्वी सुर्यफुलाचे उत्पन्न भुईमूग, ज्वारी, आदि पिकांमध्ये घेतले जायचे. शेती कमी असणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतात अडतासाला हमखास सुर्यफुलाचे ताटवे उठून दिसायची. हल्लीमात्र हे चित्र पुसटसे झाले असून सद्यस्थितीत सुर्यफुल दिसणे दुर्मिळ झाले आहे.

### पेरणी करण्यास धजावेना

चिखलदरा, अचलपुर, अंजनगाव, दर्यापुर तालुक्यात सूर्यफूलाची पेरणी नगण्य झाली आहे. शेतकरी हा पारंपरिक पीक पेरणीकडे वळला असल्याने सूर्यफूल, जवस, करडई पेरणी करण्यास धजावत नाही. त्यात पक्षांकडून सूर्यफूलाच्या बिया मोठ्या प्रमाणात खाल्ल्या जात असल्याने धास्तवले आहेत. पीक पेरणी पध्दतीत बदल केल्याने जमिनीची पोत सुधारते म्हणून शेतकऱ्यांनी येत्या हंगामात सूर्यफूल, करडई, जवस सारख्या गळीत वाणाची पेरणी करावी. यासाठी कृषी विभागाकडून मार्गदर्शन केले जाईल.

### शेणखताच्या जोरावर सूर्यफूलाच्या ताट्यावर पराग

सेंद्रिय शेणखताच्या जोरावर पिके घेतली जायची तेव्हा सुर्यफुलाच्या ताट्यावर पराग कण वेचण्यासाठी मधमाश्यांचा गोंगाट असायचा. बांधावरील झाडा झुडपावर मधमाशांचे पोळ आढळून यायची. काळ बदलत गेला. तालुक्यात सुर्यफुलाचे ताटवे दिसेनासे झालेत. रासायनिक विषारी औषधांमुळे मधमाशा नाहिशा होत गेल्याने बांधावरील, डोंगर कपारीतील मधमाशांचे पोळे आढळून येणे दुर्मिळ झाले आहे.

# स्थानिक विकास कामांसाठी प्रत्येक आमदाराला मिळणार एक कोटी 80 लाख रुपये

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) –** विधानसभा निवडणुकीत पाच आमदार नव्याने निवडून आले आहे. या आमदारांना स्थानिक विकास कामांसाठी मार्चपर्यंत 1.80 कोटींचा विकास निधी उपलब्ध होणार आहे. शिवाय तीन आमदार पुन्हा निवडून आले आहेत. त्यांचा यापूर्वीच्या टर्मचा निधी पूर्ण झालेला आहे, म्हणजेच त्यांनादेखील एवढाच निधी मार्चपर्यंत मिळेल. दरम्यान 31 जानेवारीला पालकमंत्री आढावा घेणार असल्याने नियोजन विकास जिल्हा आराखड्यात व्यस्त आहे.

तिवसा मतदारसंघात राजेश वानखडे, मोर्शी–वरुडमध्ये उमेश यावलकर, अचलपूरमध्ये प्रवीण तायडे, मेळघाटमध्ये केवळराम काळे, तर दर्यापूरमध्ये गजानन लवटे पहिल्यांदा निवडणूक आले. तर, धामणगाव मतदारसंघात प्रताप अडसड, बडनेरात रवी राणा व अमरावतीत सुलभा खोडके पुन्हा विजयी झाल्याने त्यांना मिळणार पाच कोटींचा निधी कायम राहणार आहे,

**आरोग्य, रस्ते–पुलासाठी सर्वाधिक 98.50 कोटी**

आराखड्यात 72.70 कोटींची आरोग्य व रस्ते, पुलासाठी 40, नगरविकास 34.52, पशुसंवर्धन 11.70, वन 27.23, सहकार 3, ग्रामीण विकास 30, पाटबंधारे 11, क्रीडा 8, उच्च शिक्षण 16, तिर्थक्षेत्र विकास 12, शिक्षण 24, महिला व बाल कल्याण 12.50, उर्जा 30, पर्यटन 15, साबां 8, गृह विभाग 12.50 व परिवहनसाठी 3 कोटींची तरतूद आहे.

# हिरोजी इंदुलकर पुरस्काराने सन्मानित

**अमरावती** – सहायक संचालक नगर रचना मूल्यांकन कार्यालयात कार्यरत नगर रचनाकार प्रविण पेटे यांची 'स्वराज्य अभियंता हिरोजी इंदुलकर' या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार दि. 31 जानेवारी रोजी पुणे येथे मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

# अंजनगाव बारी येथे आढळला कुजलेला मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि. 28 )** – अंजनगाव बारी येथील गोठान परिसरात असलेल्या रेल्वे पुला नजीक अज्ञात व्यक्तीचा कुजलेला मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. बडनेरा पोलिसांनी हा मृतदेह ताब्यात घेतला असून मृतक व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी तपास सुरू केला आहे.

अंजनगाव बारी येथे गावालगत असलेल्या गोठान परिसरात रेल्वे पुलाखाली काही लोकांना अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. हा मृतदेह पूर्णत: कुजलेल्या अवस्थेत होता. याबाबत तात्काळ बडनेरा पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला व पंचनामा केला. शवविच्छेदनासाठी मृतदेह रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. हा मृतदेह नेमका कुणाचा आहे व त्याचा मृत्यू कसा झाला याचा शोध घेण्यासाठी बडनेरा पोलिसांनी तपास सुरू केला आहे. बडनेराचे ठाणेदार सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वात पुढील कारवाई करण्यात येत आहे.

# संक्रांती निमित्त महिला पालकांचा मेळावा

## मोर्शीच्या शिवाजी शाळेत आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि. 28 )–** मोर्शी येथील शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत संक्रांतीनिमित्त महिला पालकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्त हळदी कुंकवा सोबतच उखाणे स्पर्धा व अन्य मनोरंजनात्मक कार्यक्रम व स्पर्धा पार पडल्या. मेळाव्याला उपस्थित असलेल्या महिलांसाठी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. सुमारे पाचशे महिला पालक या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

महिलांमध्ये वाढत असलेले कर्करोग व अन्य आजारांचे प्रमाण याविषयी घ्यावयाची खबरदारी आणि जीवन पद्धतीमध्ये करावयाचा बदल आदींबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच महिलांची आरोग्य तपासणीही करण्यात आली. त्यानंतर उखाणे स्पर्धा घेण्यात आली. महिलांनी सादर केलेल्या उखाण्यांमुळे या मेळाव्याला चांगलीच रंगत प्राप्त झाली. विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम व स्पर्धाही घेण्यात आल्या. याप्रसंगी अमरावती येथील प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ व पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेजच्या विभाग प्रमुख डॉ. सुरेखा तायडे यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मीना ठाकरे, डॉ. सुरेखा तायडे, साधना चंदेल, सुनीता जगताप, अर्चना लुंगे, पल्लवी जावरकर, मेघना मडघे, दिपाली ठाकूर, किरण कुऱ्हाडे, डॉ. ऋजुजा श्रीराव, अर्चना अर्डक, निलक्षी गणगणे, दिपाली निकम, सुनिता रडके, प्रतिभा मोहोळ प्रामुख्याने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन वर्षा निंघोट, प्रेमा नवरे, विशाखा ठाकरे, मुक्ता सावरकर, वैशाली देशमुख, विजया तारेकर, शितल डोळे, वर्षा साठवणे, विजया रोकडे, पद्मा बनकर, पूजा मेटकर, प्राजक्ता जोशी, संगीता हेडाऊ, जया धकीते, अर्चना तराळ, सुषमा गायकवाड, प्रवीणा बहुरूपी, हर्षा पाटील, सुषमा बोबडे, लता लांडगे, कु. खडसे, आश्लेषा जाधव, धनश्री कोंबे, भाग्यश्री डोले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाखा ठाकरे यांनी तर आभार प्रदर्शन शितल टोळे यांनी केले.

# डॉ. मोहनीश गोतमारे शिवसेना डॉक्टर सेलच्या विदर्भ प्रमुख पदी

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, ( दि. 28 )–** अचलपूर–परतवाडा शहरातील प्रसिद्ध युवा अस्थिरोग तज्ञ डॉ. मोहनीश गोतमारे यांची एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या डॉक्टर सेलच्या विदर्भ विभाग प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते डॉ. गोतमारे यांना नुकतेच नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. डॉक्टर सेलच्या विदर्भ प्रमुख पदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉक्टर मोहनीश गोतमारे यांचा शिवसेना, युवासेना आणि वैद्यकीय कक्षाच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी युवासेनेचे जिल्हाप्रमुख प्रितेश अवघड श, अचलपूर तालुकाप्रमुख विवेक महाले, उपतालुकाप्रमुख निखिल दहीहंडे, अचलपूर शहर प्रमुख आतिश अहिर, विलास सोळंके, अविनाश सुरवशे, वैद्यकीय कक्ष जिल्हाप्रमुख डॉ. राजाभाऊ माहुलकर, नरेश भाकरे, उपशहर प्रमुख सुनील चित्ते, रितेश कोठाळे, युवा सेनेचे तालुकाप्रमुख निखिल डमारे, मोहन गौर, राज बेरडे आदी उपस्थित होते.



# खंडित झालेल्या मुर्त्या महापालिकेच्या स्वाधीन

## एमएच 27 – एटीएस ग्रुपचा स्तुत्य उपक्रम | पर्यावरण संरक्षण व स्वच्छतेसाठी पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.28 )–** शहरातील एम. एच. 27 एटीएस ग्रुप या स्वयंसेवी संस्थेने विविध उत्सवांमध्ये स्थापन करण्यात आल्यानंतर खंडित झालेल्या मुर्त्या पर्यावरण व स्वच्छतेच्या दृष्टीने अडचणीच्या ठरू नये याकरिता त्या गोळा करून महापालिकेच्या झोन कार्यालयाच्या स्वाधीन करण्यात आल्या. या त्सुत्य उपक्रमाची सर्वत्र प्रशंसा करण्यात येत आहे. एम.एच. 27 एटीएस ग्रुप तर्फे गेल्या सतरा वर्षांपासून दसऱ्याच्या मुहूर्तावर अंबादेवी व एकवीरा देवीच्या चरणी अर्पण केली जाणारी सोने अर्थात आपट्याची पाने गोळा करून स्वच्छता अभियान राबविण्यात येते. त्यासोबतच महालक्ष्मी, गणेश चतुर्थी उत्सवात शिल्लक राहणाऱ्या अन्नाची नासाडी होऊ नये म्हणून योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जाते. तसेच खंडित झालेल्या देवी व गणपतीच्या मूर्ती पर्यावरण व स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून अडचणीच्या ठरू नये म्हणून संस्थेतर्फे त्या ताब्यात घेऊन एकत्रित केल्या जातात. संस्थेने गोळा केलेल्या अशा मुर्त्या नुकत्याच मनपा झोन कार्यालयांच्या स्वाधीन करण्यात आल्या. मनपाचे सहाय्यक आयुक्त भूषण पुसदकर व दीपिका गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा छोटेखाणी कार्यक्रम पार पडला. दोन्ही अधिकाऱ्यांनी एम. एच. 27 – एटीएस ग्रुपच्या या कार्याचे मुक्तकंठाने कौतुक केले.

यावेळी अंजली पांडे, छाया किशोर कडू, प्रमोद पांडे, किशोर कडू, चौधरी, गुल्हाणे, पाटील, केने, राहणे, गुप्ता, भजेकर, पाल, लोखंडे, राऊत, बर्गे, महाले, गजभिये, भाटकर, इंदुरकर, सराफ, देशमुख, दाते, गडमुखे,कदम, बिजवे, जोशी, वाघ, वानखेडे, आगाशे, वराडे, दिवाण, देशपांडे, राणे, पाठक, पवार, धरणे, भिडे, गायबोले आदी प्रामुख्याने उपस्थित होते.





# गांधी विद्यालयात प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहात



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि. 28 )–** न्यू एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित गांधी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय प्रजासत्ताकाचा 76 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंत देव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी शाळा समिती सभापती रामेश्वर लाड, गांधी इंग्रजी प्राथमिक शाळेचे सभापती रमेश सुने, अरुण निमकर प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या वतीने राष्ट्रध्वजाला व पाहुण्यांना मानवंदना देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत भाषणे व नृत्य सादर केले. कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत प्रभात फेरीही काढण्यात आली. कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्या अनिता सदाफळे, उपप्राचार्य वंदना टिक्कस, पर्यवेक्षक दिलीप इखार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 12 फेब्रुवारीला अमरावती संत रविदास महाराज जयंती उत्सव

## चर्मकार महासंघाच्या बैठक समितीचे गठन




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) –** राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांचा जयंती महोत्सव 12 फेब्रुवारी रोजी अमरावती शहरात साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवाच्या नियोजना संदर्भात चर्चा करण्यासाठी चर्मकार संघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक रविदास सांस्कृतिक भवन, सरोदे कॉलनी येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजीव जामठे होते. यावेळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश साळुंखे, शामकुमार आकोडे, प्रकाश शेलापुरकर, देविदास किटे, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष गजानन वानरे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष राधा कुरिल, भालचंद्र राठे, पांडुरंग गोंडेकर प्रामुख्याने उपस्थित होते. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि चिखलदरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी सुधाकर पानझाडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य चर्मकार महासंघाच्या कार्याला समर्पित करण्याचा संकल्प सुधाकर पानझाडे यांनी यावेळी बोलून दाखविला. यावेळी सुधाकर पानझाडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संत रविदास जयंती महोत्सवाच्या आयोजनासाठी समितीचे यावेळी गठन करण्यात आले. समितीमध्ये अध्यक्ष म्हणून सचिन परसे तर सचिव म्हणून आकाश राठोड यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे अर्जुन कटारे, प्रकाश वरजे, संतोष ब्राम्हणे, ऋतिक राठे, विजय छर्ये, रितेश कटारे, अशोक अहिरवार यांचा समितीत सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजू चव्हाण यांनी तर संचालन दिलीप वरजे यांनी केले संतोष पहारे यांनी आभार मानले. बैठकीला मोर्शी तालुका अध्यक्ष अनिल जामठे, राजू वेरूळकर, विजय खंडारे, रामदास इंगळे, रामदास तायडे, अनंत पानघडे, दयाराम तायडे, दिलीप वाघे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मोर्शी येथे राष्ट्रीय मतदार दिन साजरा

## गोविंद प्रभू औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजन




**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि. 28 )–** येथील श्री गोविंद प्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत राष्ट्रीय मतदार दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. गोविंद प्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य कमलकिशोर फुटाणे हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी प्रदीप कुमार पवार, नायब तहसीलदार कृष्णकुमार ठाकरे, महसूल विभागातील आशिष बारस्कर प्रामुख्याने उपस्थित होते. संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्त्व वाढविण्यासाठी संस्था स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आदींचा समावेश होता. त्याचप्रमाणे मतदानाप्रती जनजागृती करण्यासाठी संस्थेपासून तर दुर्गवाडा या गावापर्यंत एक रॅलीही काढण्यात आली. प्राचार्य कमल किशोर फुटाणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून लोकशाहीत मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

देशाच्या उज्वल भवितव्यासाठी आजचा मतदार कसा असावा, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. लोकशाही व्यवस्थेमध्ये मतदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे मत उपविभागीय अधिकारी प्रदीप कुमार पवार यांनी व्यक्त केले. मतदान या विषयावर त्यांनी प्रशिक्षणार्थींना सखोल मार्गदर्शन केले. सर्व उपस्थितितांकडून मतदानासाठी असलेल्या प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शुभांगी देशमुख तर आभार प्रदर्शन शंकरा मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेतील सर्व निदेशक, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी आणि रासेयोचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये मुबलक पाणीसाठा

## रब्बी हंगामात शेतकऱ्यांची चिंता मिटली



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 )–** अमरावती जिल्ह्यातील मोठ्या व मध्यम प्रकल्प क्षेत्रात सध्या पाऊस पडत नसला तरी पाणलोट क्षेत्रातून प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाणी वाहून येत आहे.

परिणामी जिल्ह्यातील अप्पर वर्धा व अन्य मध्यम प्रकल्प पूर्णत: भरले असून या प्रकल्पांमधून पाण्याचा विसर्ग करावा लागत आहे. अप्पर वर्धा या मोठ्या प्रकल्पासह सात मध्यम आणि 48 लघु पकल्पांमध्ये मुबलक जलसाठा असल्याने शेतकऱ्यांची रब्बी हंगामात ओलीताची चिंता मिटली आहे.

सत्यस्थितीत जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांमध्ये 84 टक्के एवढा जलसाठा उपलब्ध आहे. आगामी वर्षभरात पुरेल एवढा हा जलसाठा आहे.

या पाण्यातून रब्बी हंगामातील शेतीच्या सिंचनासह शहरी व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वर्षभर करता येणे शक्य होणार आहे. जुलै व ऑगस्ट महिन्यात धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सतत पाऊस झाला. चार मध्यम प्रकल्प सध्या पाण्याने काठोकाठ भरले आहे. अप्पर वर्धा जलाशयात सध्या 538 दलघमी जलसाठा उपलब्ध असून हे प्रमाण एकूण जलसाठवन क्षमतेच्या 95 टक्के एवढे आहे. भविष्यात संभाव्य पावसाचा अंदाज घेऊन प्रकल्पातून सध्या पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.अप्पर वर्धा धरणाचे तीन दरवाजे 35 सेंटीमीटरने उघडण्यात आले आहेत. त्यामधून 169 क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे. या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची रब्बी तसेच उन्हाळी हंगामासाठीची सिंचनाची चिंता मिटली आहे.

शहानुर प्रकल्पाचे चार, चंद्रभागा प्रकल्पाचे तीन तर पूर्णा व स्थापन प्रकल्पाचे प्रत्येकी दोन दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांमध्ये 885 पाणीसाठा झाला होता. आगामी काळासाठी जिल्हावासीयांसाठी ही दिलासादायक बाब आहे.

### पाणी साठ्याची स्थिती

**दलघमी मध्ये ( कंसात टक्केवारी )**

अप्पर वर्धा 538 85 (43 95), चंद्रभागा 38.47 (93) पूर्णा 28.2 (19),सापण 35. 3 (90), पंढरी 18.47 (32.74), बोर्डी नाला 5.9(84.9), 48 लघु प्रकल्प 177 (78).

# जनता विद्यालयात नेताजी सुभाष चंद्र बोस जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.28 )–** येथील जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विनोद मुगल हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक गजेंद्र अवघड, दिगंबर परडे, मंगेश डेक्कन उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते नेताजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक विनोद मुगल यांनी आपल्या भाषणातून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. शाळेतील विद्यार्थ्यांचीही याप्रसंगी भाषणे झालीत. कार्यक्रमाचे प्रास्तावित गजेंद्र अवघड यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.